# नमुना - 1

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळूण
ता. चिपळूण जि. रत्नागिरी
दिनांक - 23/02/2021

क्रमांक - भूसंपादन/थेट खरेदी/ गुहागर नगरपंचायत घनकचरा व्यवस्थापन/ एसआर - 212 / 2021

ज्या अर्थी मौजे गुहागर ता. गुहागर येथील गुहागर नगरपंचायतीसाठी घनकचरा व्यवस्थापन करणेकामी क्षेपणभुमीसाठी (डंपींग ग्राऊंड) प्रयोजनाकरीता खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेणेकामी शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-03/2015/प्र.क्र.34/अ-2 दिनांक 12 मे 2015 व दिनांक 30 सप्टेंबर 2015 मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने, मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे आदेश क्रमांक भूसं/समन्वय/कार्या-1/ई - ऑफि- 4623180/ एसआर 48/2021 दिनांक 17/02/2021 अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलएक्यूएन-01/2017/प्र.क्र.12/अ-2, दिनांक 25 जानेवारी 2017 प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अर्थी, आता

1. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी प्रविण पवार, उपविभागीय अधिकारी, चिपळूण याद्वारे ,

   i. अनुसूची एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि

   ii. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 च्या व शेडयुल - 1 च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर 25% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

   iii. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

2. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी चिपळूण व मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांचेकडे सादर करावीत.

3. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी चिपळूण व मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भुधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

4. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांच्या कार्यालयामध्ये आणि मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यास आली आहे.

## अनुसूची - एक

खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील

तालुका :- गुहागर
जिल्हा :- रत्नागिरी

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| 1 | गुहागर | 134/9 | 1.25.00 |
| **एकूण** | | | **1.25.00** |

(प्रविण पवार)
**उपविभागीय अधिकारी**
**चिपळूण**

दिनांक :- 23/02/2021
ठिकाण :- चिपळूण